# मिरा भाईंदर महानगरपालिका

**अतिक्रमण विभाग**

जा.क्र. मनपा/अतिक्रमण/२८९/२०१८-१९
दि. ०४/०८/२०१८

## //जाहिर आवाहन//

महानगरपालिका क्षेत्रात उत्सवांच्या प्रसंगी रस्त्यावर उभारण्यात येणाऱ्या सार्वजनिक मंडप इ. बाबत तसेच मनपा क्षेत्रातील शांतता क्षेत्रात ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० ची अंमलबजावणी करणेबाबत श्री. महेश विजय बेडेकर यांनी महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका तसेच महाराष्ट्र शासन यांचे विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. १७३/२०१० दाखल केली आहे.

सार्वजनिक उत्सव, सामाजिक समारंभ अथवा कार्यक्रम इ. करीता मंडप बांधण्याची परवानगी मिळणेकरीता सार्वजनिक मंडळे/संस्था/व्यक्ति उत्सव/समारंभाच्या नजिकच्या कालावधीत अर्ज करतात. प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने सर्व बाबींची पडताळणी करुन परवानगी देण्याच्या कार्यवाही करीता बराचसा कालावधी लागत असल्याने संबंधित सार्वजनिक मंडळे/संस्था/व्यक्ति परवानगी मिळण्याआधीच विना परवानगी मंडप उभारणे, विद्युत रोषणाई तसेच ध्वनी प्रक्षेपण यंत्रे बसविणे इ. ची व्यवस्था करतात. अशावेळी मंडपांमध्ये संबंधितांमार्फत देवी/देवतांच्या मुर्तीची स्थापना केल्यानंतर सदर अनधिकृत मंडपाच्या बांधकामावर कार्यवाही केल्यास नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावण्याची शक्यता असते. सदर बाबी टाळण्याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरीता खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येत आहेत.

१) मनपा क्षेत्रात साजऱ्या करण्यात येणाऱ्या सार्वजनिक धार्मिक उत्सव/सामाजिक समारंभ अथवा कार्यक्रम इ. करीता सार्वजनिक रस्ते अथवा सार्वजनिक जागांवर उभारण्यात येणाऱ्या मंडप व इतर बाबींकरीता परवानगी मिळणेकरीता संबंधित सार्वजनिक मंडळे/संस्था/व्यक्ति यांनी उत्सव/समारंभाच्या दिनांकापुर्वी एक महिना अगोदर (उदा. या वर्षी गणेश उत्सव दि. १३/०९/२०१८ रोजी आहे, त्यामुळे दि. १२/०८/२०१८ पुर्वी अर्ज प्राप्त होणे आवश्यक आहे.) संबंधित प्रभाग कार्यालयात अर्ज करणे आवश्यक आहे.

२) सदर कालावधीनंतर करण्यात येणारे अर्ज स्विकारले जाणार नाही किंवा ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

३) "मिरा भाईंदर महानगरपालिका रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप उभारण्यास परवानगी देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे २०१५" मा. महासभेच्या मंजुरीने तयार करण्यात आलेली आहेत. तरी सर्व प्रभाग अधिकारी यांनी काटेकोरपणे सदर "मार्गदर्शक तत्वे २०१५" ची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन कार्यवाही करावी.

४) संबंधित प्रभाग अधिकारी यांनी मुदतीत प्राप्त अर्जांवर त्वरीत एक आठवड्यांच्या आत निर्णय घ्यावा. परवानगी नाकारल्यास त्याबाबत सबंधितांस त्वरीत लेखी कळविण्यात यावे.

५) परवानगी प्राप्त होण्यापुर्वीच संबंधितांमार्फत मंडप बांधल्याचे आढळुन आल्यास सदर अनधिकृत मंडप काढुन टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

६) सदरची मार्गदर्शक तत्वे आगामी येत असलेल्या गणेशोत्सवापासुन पुढील सर्व सार्वजनिक धार्मिक उत्सव/ सामाजिक समारंभ अथवा कार्यक्रम इ. करीता लागु करण्यात येत आहेत.

७) तक्रारीसाठी/संपर्कासाठी टोल फ्री क्र. १८००२२४८४९ वर संपर्क साधावा.

जा.क्र.मनपा/पीआरओ/९७६/२०१८-१९
दि. ०४/०८/१८

(दिपक पुजारी)
उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका